**नि. क्र. ७६ च्या अर्जाप्रमाणे**

**आरोपी तर्फे उलटतपास – श्री. जी. जे. पाटील, वकील.**

**५**. दि. ६.६.२०२२ रोजी फिर्याद देण्यात आली होती. मी त्याच दिवशी घटनास्थळी जावून पंचनामा केला होता. मी पोलीस पाटलांना पंचाना बोलवून घेण्यास सांगितले होते. मी ११.०० वा. दरम्यान खेडगे येथे गेले होते. ११.०० ते ११.३० वा. दरम्यान पंच घटनास्थळी येवून थांबलेले होते. मला आता घटनास्थळाच्या चतुःसिमा सांगता येणार नाहीत.

**६**. घटनास्थळाच्या आजूबाजूला फिर्यादीचे भाऊबंद राहतात. फिर्यादीच्या घराशेजारी आणखी एक घर होते. मी फिर्यादीच्या शेजा–यांचा तपास कामी जबाब घेतलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीने बोलावलेल्या लोकांना पंच केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस ठाण्यात बसून घटनास्थळाचा पंचनामा केला आहे. मी दि. ९.६.२०२२ रोजी आरोपींना न्यायालयात हजर राहण्याची नोटीस दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना न्यायालयात हजर राहण्याची नोटीस दिलेली नाही.

७. मी ९.६.२०२२ रोजी साक्षीदारांचे जबाब नोंदवले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांचे जबाब फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे नोंदवले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर गुन्हयाच्या तपासकामी स्वतंत्र साक्षीदाराचा जबाब नोंदवला नाही. मी फिर्यादीकडून दि. १६.६.२०२२ रोजी कागदपत्रे मिळवली होती. मला फिर्यादीने आरोपींकडे जमीनीची वाटणी मागितल्याची माहिती नाही. आता मला साक्षीदार क्र. ४ च्या व साक्षीदार क्र. ५ च्या जबाबातील अधोरेखांकित भाग 'अ' व 'ब' वाचून दाखवले ते मला त्यानी जबाब देताना सांगितला नव्हता.

८. हे म्हणणे खरे नाही की, मला तपासामध्ये आरोपींनी फिर्यादीच्या चारित्र्यावरती संशय घेवून तिच्याकडे पैशांची मागणी करून तीचा शारिरीक व मानसिक छळ केल्याचे दिसून आले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीच्या जवळच्या नातेवाईकांचे जबाब नोंदवून खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला साक्षीदारानी आरोपींसोबत त्यांचा जमीनीचा वाद असल्याचे सांगून देखील मी खोटा तपास

करून खोटा गुन्हा दाखल केला आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.** **श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक - २०.११.२०२५. (आर. पी. थोरे)

आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.

**प्रमाणपत्र**

सदर साक्ष नोंदवण्यापूर्वी व्ही.सी. / दृकश्राव्य माध्यमाची तपासणी करण्यात आलेली असून चलचित्र व आवाज स्पष्टरित्या येत असल्याची साक्षीदार व सरकारी आणि आरोपीच्या वकिलांनी पृष्ठता केल्यामुळे पुरावा नोंदविण्यात आलेला आहे.

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक - २०.११.२०२५. (आर. पी. थोरे)

आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.